# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा विभागात तोतया प्राध्यापकाने प्रवेश केल्याबाबत**

**(१) ४९६६९ (२६-०५-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील परिक्षा विभागात माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास एका तोतया प्राध्यापकाने प्रवेश केल्याप्रकरणी सदर प्राध्यापकाविरुध्द पोलीसात तक्रार दाखल करणे आवश्यक असताना विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी दुर्लक्ष करीत असल्याने पोलीसात गुन्हा दाखल झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कुलगुरुंना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पत्र लिहून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही. सदर घटनेचा गुन्हा नोंद करण्यासाठी सुरक्षा अधिकारी यांना परीक्षा नियंत्रकांनी आदेश दिल्यानुसार सुरक्षा अधिकारी यांनी पहिली खबर नोंद करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बी.के.सी. पोलीस स्टेशन यांना पत्राद्वारे विनंती केली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) विद्यापीठ स्तरावर सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा शहरालगत असलेल्या गणेशपूर व बेला येथे दवडीपार मार्गावर अनेक वर्षापासून नागरिकांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(२) ५०३७१ (२०-०४-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा शहरालगत असलेल्या गणेशपूर व बेला येथे दवडीपार मार्गावर अनेक वर्षापासून नागरिकांनी शासकीय जागेवर अतिक्रमण करुन वहिवाट सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना अतिक्रमित भोगवटादारांचे पट्टे देण्यात आले नसून तसेच निवासी प्रयोजनाकरिता अतिक्रमण करणाऱ्या मागासवर्गीय लोकांना नियम ४५ प्रमाणे ती जमिन विनामूल्य प्रदान करण्याचा निर्णय १६ वर्षापूर्वी घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकरणी अद्यापपर्यंत कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यामुळे अतिक्रमण धारकांना हक्काच्या पट्ट्यापासून वंचित रहावे लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने सदर अतिक्रमणधारकांना हक्काचे पट्टे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. संबंधित अतिक्रमण धारकांना अतिक्रमित भोगवटदाराचे पट्टे देण्यात आलेले नाहीत.

(३) नाही.

भंडारा तालुक्यामध्ये गाव नमुना ७/१२ मध्ये सदर जमीन सरकार झुडपी जंगल अशी नोंद असल्यामुळे अतिक्रमण नियमानुकूल करणेची कार्यवाही करणेत आलेली नाही.

(४), (५) व (६) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८, सुधारणा नियम, २०१२ अंतर्गत मौजा-बेला येथील १० व्यक्तींनी मार्च, २०१६ या महिन्यामध्ये ग्रामस्तरीय वनहक्क समितीकडे वनहक्क दावे दाखल केलेले आहेत सदरील दाव्यांची प्रकरणे ग्रामस्तरीय समितीकडून उपविभागीय स्तरीय समितीकडे सादर केल्यानंतर उपविभागीय स्तरीय समितीमार्फत जिल्हास्तरीय समितीकडे प्राप्त होताच प्रस्तुत वनहक्क दाव्यांच्या मंजुरीबाबत नियमानुसार कार्यवाही करणेत येईल.

---

**महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या महावितरण कंपनीचे विभाजन करण्याबाबत**

**(३) ५०५६० (२०-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या महावितरण कंपनीचे मराठवाडा,विदर्भ,पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि उर्वरित महाराष्ट्र असे चार छोट्या कंपन्यात विभाजन करण्याची कार्यवाही

करण्याची योजना राज्य स्तरावर तयार करण्यात आल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभाजनामुळे मराठवाडा, विदर्भ येथील सततचा दुष्काळ,औद्योगिक ग्राहकाची कमतरता, शेती व सलग्न विजेचा वापर, जनरेशन युनिट नसणे, ट्रान्समिशन लाईन तुटपुंजी असणे, आदी कारणाने या कंपन्या सक्षम काम करू शकत नसल्याने व शेतकऱ्यांना व सामान्य जनतेला योग्य सेवा मिळू शकत नसल्याने सदर विभाजन करण्यात येऊ नये अशी मागणी महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेने मा.मुख्यमंत्री, मा.उर्जा मंत्री व महावितरण चे कार्यकारी संचालक यांच्याकडे दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व सदर विभाजन न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) अश्या आशयाचे निवेदन महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रीसिटी वर्कर्स युनियन, बीड यांनी दिले आहे.

(३) व (४) महावितरण कंपनीने वीज वितरण व्यवस्था सुरळीत व परिणामकारकरित्या रहावी व अखंडीत वीज पुरवठा करण्याचे ध्येय साध्य होण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर अधिक परिणामकारक यंत्रणा निर्माण व्हावी या उद्देशाने व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने कल्याण, पुणे, नागपूर व औरंगाबाद या ठिकाणी कंपनी अंतर्गत प्रादेशिक कार्यालये दि. ०२.१०.२०१६ पासून निर्माण करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत महावितरण "इंफ्रा" विभागाकडून विद्युत विषयक कामे करत असतांना अनियमितता आढळून आल्याबाबत**

**(४) ५४४३६ (१६-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला, (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत महावितरण "इंफ्रा" विभागाकडून विद्युत विषयक कामे करत असतांना मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून येत असल्याचे माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध ठिकाणी लाईन टाकत असतांना चुकीच्या पद्धतीने खोदाई करून असुरक्षितरित्या कामे चालू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१), (२), (३) व (४) सदर कंत्राटदाराने केलेल्या कामाची तपासणी केली असता काही त्रुटी आढळून आल्या होत्या. त्या त्रुटींची पूर्तता कंत्राटदाराने केल्या आहेत.
तसेच निविदेच्या नियम व अटी अनुसार ज्या कामांमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत अशा त्रुटी दूर केल्याशिवाय ठेकेदारास एकूण देयकाच्या रकमेपैकी २०% रक्कम अदा करण्यात येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिरोशी ग्राम पंचायत हद्दीतील वाधाने (ता.मुरबाड जि.ठाणे) हे गाव विद्युत रोहित्र जळाल्याने गेल्या ६ महिन्यापासून अंधारात असल्याबाबत**

**(५) ५४७६९ (१६-०८-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोशी ग्राम पंचायत हद्दीतील वाधाने (ता.मुरबाड जि.ठाणे) हे २५० लोक वस्ती असलेले गाव विद्युत रोहित्र जळाल्याने गेल्या ६ महिन्यांपासून अंधारात असल्याचे माहे मे, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावामध्ये वीज नसल्याने अनेक ग्रामस्थांनी गाव सोडले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने उपरोक्त गावातील गेल्या सहा महिन्यापासून जळलेली विद्युत रोहित्र तातडीने दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१), (२), (३) व (४) वाधाने वाडीतील २५ केव्हीए विद्युत रोहित्र दि.२५.२.२०१६ रोजी नादुरुस्त झाले होते. रोहित्राची उपलब्धता होताच दिनांक २८.०५.२०१६ रोजी नादुरुस्त रोहित्र बदली करुन वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. सदर रोहित्रावर एकूण १८ वीजग्राहक असून रोहित्र बदलण्यास दिरंगाई झाल्याने त्यास जबाबदार संबंधित शाखा अभियंता व जनमित्र यांच्यावर महावितरण कंपनी मार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे तालुक्यात वाढते भारनियमन आणि सतत खंडीत होणारा वीज पुरवठा

**(६) ५५८६५ (१६-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यात वाढते भारनियमन आणि सतत खंडीत होणारा वीज पुरवठा यामुळे शेतकरी त्रस्त झाले असल्याचे माहे मे, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्युत पोल आणि ट्रान्सफॉर्मर यांची कामे निधी अभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) धुळे तालुक्यातील वितरण प्रणाली सक्षमीकरणासाठी पायाभूत आराखडा-२ या योजनेंतर्गत ३३/११ के.व्ही. क्षमतेचे चार नवीन उपकेंद्रे कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. तसेच ३३/११ के.व्ही.लामकानी उपकेंद्रात अतिरिक्त क्षमता वाढ अंतर्गत ५ एम.व्ही.ए.चे रोहित्र कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. प्रणाली सुधारणेअंतर्गत १०० केव्हीए क्षमतेचे ६० नवीन रोहित्र बसविण्यात आली आहेत. जिल्हा योजनेअंतर्गत ६३ केव्हीए क्षमतेचे नवीन ३५ रोहित्र कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यातील ५ हजार शेतकरी व ३ हजार घरगुती वीज जोडणी देण्याबाबत

**(७) ५६१८० (१६-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील ५ हजार शेतकरी व ३ हजार घरगुती वीज जोडणी देण्याचे आश्वासन मा.ऊर्जा मंत्री महोदयांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास देण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रश्नाबाबत मा.ऊर्जा मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार शेतकरी व घरगुती वीज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) धुळे जिल्ह्यामध्ये मार्च, २०१५ अखेर ३,८८८ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सन २०१५-१६ मध्ये १७८० इतक्या कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. सन २०१६-१७ मध्ये ५२२८ कृषीपंप वीज जोडणीकरिता पैसे भरुन प्रलंबित होते. मार्च, २०१७ अखेर २०४४ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. मार्च, २०१६ अखेर ९९६ घरगुती ग्राहक पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी मार्च, २०१७ अखेर ८७३ घरगुती वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील सप्तश्रृंगी देवी जवळील तारा दुरुस्ती करण्याबाबत**

**(८) ५६८३६ (१६-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील सप्तश्रृंगी देवी जवळील डीपीच्या तारा पूर्णपणे खाली लोंबकळत असून हवेमुळे या तारांचे घर्षण होऊन मोठ्या प्रमाणावर स्पार्किंग होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या विद्युत तारांची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणंती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
दिनांक २५ मे, २०१६ रोजी देऊळगावराजा उपविभागात वादळी वाऱ्यामुळे विद्युत यंत्रणा विस्कळीत झाली होती.
(२) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) सप्तशृंगी देवी मंदिराजवळ एल.टी. लाईनचे पोल वादळामुळे झुकले व तारा खाली आल्या होत्या. महावितरण कंपनीमार्फत सदरील लघुदाब वाहिनीचे वाकलेले दोन पोल सरळ करण्यात आले व लोंबकळत असलेल्या विद्युत तारा पुन्हा ओढून व्यवस्थित करुन विद्युत पुरवठा दिनांक २६.०५.२०१६ रोजी सुरळीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयात महावितरणाच्या उघडया डीपीमुळे शॉर्टसर्किट, आग लागण्याचे प्रकार, तारा सुटण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याबाबत

**(९) ५७०७४ (१८-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात महावितरणच्या डीपी उघडया असून या उघडया डीपीमुळे शॉर्टसर्किट, आग लागण्याचे प्रकार, तारा सुटण्याचे प्रकार घडत असल्याने या उघडया डीपी तातडीने दुरुस्त करण्याकरिता तेथील नागरीक वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी करीत आहे, हे खरे आहे कय,

(२) नाशिक शहरात महात्मा गांधी रोडवरील दोन विद्युत रोहित्रांचे (डीपी) दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या सुमारास उन्हाच्या कडाक्याने डीपीचा स्फोट झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या आगीत किती वित्तहानी झाली आहे,

(४) असल्यास, अशा प्रकारे उन्हाच्या कडाक्यामुळे आग लागण्याचे प्रकार पुन्हा घडू नये म्हणून पावसाळयापर्वी तातडीने डीपीची दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०६-२०१७) :**(१) नाशिक शहर मंडल अंतर्गत मिनी फिडर पिलरचे दरवाजे चोरीस जाणे इ. सारखे प्रकार वारंवार घडत असल्याने महावितरणकडून अशा ठिकाणी पुन्हा दरवाजे बसविले जात आहेत. तसेच शहरातील आवश्यक त्या ठिकाणी भूमीगत वाहिन्या केल्या असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) नाशिक शहरात महात्मा गांधी रोडवरील दोन विद्युत रोहित्रांचे (डीपी) दिनांक १८.५.२०१६ रोजी उन्हाच्या कडाक्याने डीपींचा स्फोट झालेला नाही. परंतु रोहित्राच्या विद्युत पुरवठ्यासाठी असलेल्या लघुदाब केबल जळाल्याने सदरची घटना घडलेली आहे. त्यात रोहित्राचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पावसाळ्यापूर्वी लघुदाब व उच्चदाब वाहिनीची देखभाल केली जाते. त्यामध्ये विद्युत वाहिनीवर असलेल्या झाडाच्या फांद्या तोडणे, रोहित्रामधील तेल तपासणे व त्याची लेवल करणे, डिस्ट्रीब्युशन बॉक्स बदलविणे, डिस्क इन्सुलेटर व पिन इन्सुलेटर तपासणी करुन बदलविणे, खली आलेल्या विद्युत वाहिनीस पुर्ववत करणे इ. कामे केली जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार तालुक्यातील (जि. बुलढाणा) आदिवासी बहुल मौजे टिटवी येथील नऊ आदिवासी कुटुंब अंधारात असून तात्काळ वीज पुरवठा सुरु करण्याबाबत**

**(१०) ५८५८९ (१६-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार तालुक्यातील ( जि. बुलढाणा) आदिवासी बहुल मौजे टिटवी येथील नऊ आदिवासी कुटुंब महिन्यापासून अंधारात असून सदरहू वीज पुरवठा तात्काळ सुरु न केल्यास आमरण उपोषणास बसण्याचा इशारा आदिवासी कुटंबानी दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने वीज पुरवठा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आह वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१) दिनांक ०३ मे, २०१६ रोजी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे लोणार तालुक्यातील बहुतांश ठिकाणी वीज वाहिनीचे खांब पडून वीज पुरवठा खंडीत झाला होता. मौजे टिटवी येथील खंडीत वीज पुरवठयाची पर्यायी मार्गे जोडणी करुन वीज पुरवठा तातडीने सुरळीत करण्यात आला व वाहिनीचे पडलेले व तुटलेले खांब पुनश्च: उभारणी करुन दिनांक २१ मे, २०१६ रोजी वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.

(२) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे. मौजे टिटवी, ता.लोणार, जि. बुलढाणा येथील वादळी वाऱ्यामुळे खंडीत वीज पुरवठयाबाबत पाहणी व पंचनामा करुन तातडीने वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव (जि.पुणे) तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात मिटर रिडिंग न घेताच वीजबिले आकारली जात असल्याबाबत**

**(११) ५८६११ (१६-०८-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागामध्ये विद्युत कंपनीकडून मिटर रिडिंग न घेता मोठ्या रक्कमेची वीज देयके आकारली जात असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच डिंभे येथील शाखा कार्यालय नेहमीच बंद राहत असल्याने तेथील आदिवासी जनतेला यांचा त्रास होत असल्याने या संदर्भात दिनांक ०३ जून, २०१६ रोजी ऊर्जा मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय काय आढळून आले व त्या अनुषंगाने अदिवासी बांधव यांचे मिटर रिडिंगनुसारच विद्युत देयके देण्याबाबत तसेच डिंभे येथील शाखा कार्यालय सुटीचे दिवस वगळता दररोज कार्यालयीन वेळेत चालू ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) महावितरण कंपनीकडून चौकशी करण्यात आली आहे.
(४) आदिवासी भागातील ग्राहकांना मिटर रिडिंगनुसारच विद्युत देयके देण्याबाबत तसेच डिंभे येथील शाखा कार्यालय सुट्टीचे दिवस वगळता दररोज कार्यालयीन वेळेत चालू ठेवणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना, कार्यकारी अभियंता, मंचर विभाग यांनी लेखी सूचना दिलेल्या आहेत.

---

### महाराष्ट्र राज्य वीज महापारेषण कंपनीमध्ये तांत्रिक वर्गातील कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता व इतर जागांकरीता सरळ सेवा भरती, करण्यात आल्याबाबत

**(१२) ५९१४९ (१६-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज महापारेषण कंपनीत दिनांक ८ जानेवारी, २०१४ मध्ये तांत्रिक वर्गातील कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता व इतर जागांकरीता सरळ सेवा भरती करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भरतीमध्ये नोकरीत घेतलेल्या उमेदवारांनी बोगस व बनावट प्रमाणपत्रे सादर करुन फसवणूक केल्याबाबतची तक्रार महाराष्ट्र राज्य वीज महापारेषण कंपनीला प्राप्त झाल्यानंतर सरळ सेवा भरतीतील गैरप्रकाराबाबत चौकशी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत बोगस व बनावट प्रमाणपत्र सादर करणाऱ्या किती अभियंते व कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, चौकशीची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०६-२०१७) :**(१) व (२) होय. याप्रकरणी महापारेषण कंपनीकडून चौकशी करण्यात आली आहे.
(३) दोषी ३५ उमेदवारांची नियुक्ती रद्द करुन त्यांना नियुक्तीपूर्वीच्या मूळ पदावर पुनर्स्थापित करण्यात आले आहे व त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही महापारेषण कंपनीकडून करण्यात येत आहे तसेच महापारेषण कंपनीचे कर्मचारी नसलेल्या ३ उमेदवारांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

(४) सदर ३५ उमेदवारांपैकी १६ उमेदवारांच्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती आदेश दिले असल्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई कंपनीने तूर्त स्थगिती केली अहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये भूमिगत वीजवाहिन्या उघड्या असल्यामुळे नागरिकांना विजेचे धक्के बसत असल्याबाबत**

**(१३) ५९६७४ (१६-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये २७ गावे तसेच, कोळसेवाडी, गणेशवाडी, खडेगोळवली आदी भागांमध्ये भूमिगत वीज वाहिन्या उघड्यावर असल्याने नागरिकांना विजेचे धक्के बसत असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज वाहिन्यांचे काम संथ गतिने होत असल्याने रस्त्यांची कामे देखील मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने वीजवाहिन्यांची कामे त्वरीत होण्याच्या दृष्टीने संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :**(१), (२) व (३) कल्याण विभागामध्ये कोळसेवाडी, गणेशवाडी, खडेगोळवली आदी भागांमध्ये भूमिगत वीज वाहिन्या उघडयावर असल्याने नागरिकांना वीजेचे धक्के बसत असल्याबाबतची कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पाडळी (ता. बुलडाणा) येथील ३३ केव्ही उपकेंद्र तांत्रीक अडचणीमुळे वारंवार बंद पडत असल्याबाबत**

**(१४) ५९७०६ (१६-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पाडळी (ता. बुलडाणा) येथील ३३ केव्ही वीज उपकेंद्र तांत्रिक अडचणीमुळे वारंवार बंद पडत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थ व शेतक-यांची अडचण लक्षात घेता सदर उपकेंद्राच्या तांत्रीक अडचणी दूरूस्ती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनीधीं यांनी दिनाक १९ नोव्हेंबर २०१५ वा त्या सुमारास म.रा.वि.वि. कंपनीला निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनावर शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून अनुषंगाने उपकेंद्रातील तांत्रीक अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१) दि. १५,१६ व २२ सप्टेंबर, २०१५ दरम्यान वादळी पावसामुळे १३२ के.व्ही. उपकेंद्र बुलढाणा येथुन निघणाऱ्या वाहिनीमधे दोष निर्माण झाल्यामुळे तीन वेळा ०१: ४८ मिनिटांसाठी वीज पुरवठा खंडीत झाला होता. तसेच मौजे पाडळी (ता. बुलढाणा) येथील ३३ के.व्ही. उपकेंद्रातील उपकरणांच्या दुरुस्तीच्या तातडीच्या कामांकरिता दि. २४.०९.२०१५ रोजी ०१ : ३५ मिनिटांचा शटडाऊन घेऊन कामे करण्यात आली आहेत .

(२) महावितरण कंपनीस निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महावितरण कंपनीकडून सदर उपकेंद्रातील ए.बी स्वीच दुरुस्त करण्यात आला आहे. तसेच देऊळघाट व दहिद गावठाण फिडर्सचे मिटर, ३३ के.व्ही. इनकमरचे सदोष बी. फेज पी. टी. व सी. टी., सदोष रिले व ५ बॅटरी सेल बदलण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वसई तालुक्यातील (जि. पालघर) शहरी व ग्रामीण भागात वीज ग्राहकांना वाढीव वीज देयके पाठविल्याबाबत

**(१५) ५९९७८ (१६-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील (जि. पालघर) शहरी व ग्रामीण भागात फेब्रुवारी ते मे, २०१६ या कालावधीत उन्हाळ्यात वारंवार वीज खंडित होऊनही वीज कंपनीने स्थानिक वीज ग्राहकांना वाढीव वीज देयके पाठविण्यात आल्याने वीज ग्राहकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी महावितरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे तक्रारी करुनसुद्धा त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच वीज मीटर बंद असल्याच्या लेखी तक्रारी करुनही अनेक महिने त्याची महावितरण कंपनी दखल न घेता, मीटर बदलून झाल्यावर त्याचा योग्य तो अहवाल पाठवित नसल्याच निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने वीज मिटर बंद असतांना ग्राहकांना वाढीव वीज देयके पाठविण्यात आल्याबाबत विज वितरण कंपनीच्या दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७)** :(१) सदर कालावधीतील एकूण २१११४८ ग्राहकांची चुकीची वीज देयके दुरुस्त करुन देण्यात आलेली असून ग्राहकांनी त्याचा भरणा केलेला आहे.

(२), (३) व (४) महावितरण कंपनीच्या वसई मंडळाअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये जुने व नादुरुस्त एकूण १,०२,७४४ मीटर बदली करण्यात आली असून त्याची महावितरण कंपनीच्या तंत्रज्ञान विभागामध्ये नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच चुकीचे रिडिंग घेतल्या प्रकरणी संबंधित मीटर रिडिंग एजन्सीवर दंडात्मक कार्यवाही करुन रु. ३,०६,११९ इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वसई (जि.पालघर) तालुक्यात मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या वीज चोरीबाबत

**(१६) ६००७२ (१६-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात वीजेच्या एकाच खांबावर शेकडो आकडे टाकून वीजचोरी केली जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजचोरीला आळा घालण्यासाठी गेल्या कित्येक वर्षापासून सामाजिक संस्था, जागरुक नागरिकांकडून महावितरणकडे तक्रारी केल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारीकडे महावितरण कंपनी दुर्लक्ष करीत असून, वीजचोरांना महावितरण पाठीशी घालत असल्याचाही आरोप नागरिकांनी केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वीजचोरी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ या कालावधीत महावितरण कंपनी मार्फत वसई-विरार या दोन विभागामध्ये विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम१३५ अंतर्गत एकूण ३०१९ इतक्या वीज चोऱ्या पकडल्या असून १२४५ वीजेचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व रु. १५८.८२ लाख इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच कलम १२६ अंतर्गत ४३० ग्राहकांवर कारवाई करण्यात आली असून रु. ५४.० लाख रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती येथे कृषीपंपाना विद्युत जोडणी देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१७) ६१०९४ (१६-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे गत आर्थिक वर्षातील सहा हजार सव्वीस कृषीपंपाना विद्युत जोडणी देण्यासाठी तब्बल ६० कोटी रुपयांच्या निधीची गरज असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच अनुषंगाने निर्णय घेऊन शेतक-यांना दिलासा देण्यासाठी सदर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०६-२०१७) :**(१), (२) व (३) अमरावती जिल्ह्यामध्ये मार्च, २०१७ अखेर ७२४२ पैसे भरुन प्रलंबित कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्याकरिता रु.७०.२५ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यासाठी १,००० कृषीपंप ऊर्जीकरण करण्याची तरतूद करण्यात आली असून माहे मार्च, २०१७ अखेर ७०७७ कृषीपंपाचे कामे पूर्ण करण्यात आली आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील महावितरण कंपनीचे गंजलेले व वाकलेले खांब त्वरीत बदलण्याबाबत**

**(१८) ६१७६६ (१८-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वाडा,नंडोरे/पालघर, कासा, मनोर,बोर्डी,वसई,तलासरी या भागातील महावितरण कंपनीचे वीज पुरवठा करणारे खांब गंजलेल्या स्थितीत असल्याचे माहे जून २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील शहरातील रस्त्यांच्या कडेला,गल्लीबोळात, किनाऱ्यावर आणि गाव भागातील पाडयांच्या वदळींच्या भागात व शेताच्या बंधाऱ्यावर तुटलेल्या विजेच्या उघडयावर असलेल्या तारा व डीपी,गंजलेले आणि वाकलेल्या खांबामुळे गतवर्षी अनेक शेतमजुरांनच्या, जनावरांना अपघाततात जीव गमवावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी महावितरणाकडे वारंवार तक्रार करुन देखील सुध्दा अद्याप महावितरणाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचे गंजलेले व वाकलेले खांब त्वरीत बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

पालघर लघु मंडळांतर्गत सन २०१५-१६ या वर्षात १६ व सन २०१६-१७ या वर्षात २३ जनावरांचा विद्युत अपघातात मृत्यू झाला आहे. सदर कालावधीमध्ये कुठल्याही शेतमजुराचा विद्युत अपघाताने मृत्यू झालेला नाही.

(३) हे खरे नाही.

(४) पालघर लघु मंडळामध्ये विविध योजनेअंतर्गत एकूण ६१११ विद्युत खांब, एकूण ४१४.५४ कि.मी. कंडक्टर, बदली करण्याचे काम झालेले आहे. तसेच २१३५ विद्युत खांब, ११२ कि.मी. कंडक्टर बदली करण्याचे कामे मंजूर झालेली आहेत. तसेच ४९० विद्युत खांब, १५ कि.मी. कंडक्टर बदली करण्याची कामे प्रस्तावित आहेत. तसेच पालघर जिल्हा अंतर्गत पालघर, सफाळा, डहाणू, तलासरी, जव्हार, विक्रमगड या तालुक्यात विजेचे अपघात टाळण्याच्या दृष्टीने लघुदाब वाहिन्यांवर सुमारे १८२८२ स्पेसर्स लावण्याचे काम पूर्ण झाले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यात महावितरण कंपनी विद्युत वाहिनीतील अडथळा दूर करण्याच्या नावाखाली जिल्ह्यात वृक्षतोड करीत असल्याबाबत**

**(१९) ६२११८ (१८-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळावर मात करण्यासाठी राज्य शासनाने वृक्षलागवड सक्तीची केली असूनही वाशिम जिल्ह्यात महावितरण कंपनी विद्युत वाहिनीतील अडथळा दूर करण्याच्या नावाखाली जिल्ह्यात वृक्षतोड करीत असल्याचे माहे जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीकडून विदयुत वाहिनीतील अडथळा दूर करण्याच्या नावाखाली वृक्षतोड करीत असल्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०६-२०१७) :**(१), (२) व (३) ज्या ठिकाणी विद्युत वाहिन्यांमध्ये झाडाच्या फांदया पसरल्यामुळे तसेच वारा वादळामुळे झाडांच्या फांदया वारंवार विद्युत वाहिन्यांच्या संपर्कात येऊन वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता असते फक्त अश्याच फांदया महावितरण कंपनीतर्फे छाटण्यात आल्या आहेत.

वाशिम जिल्ह्यात दि.१/०७/२०१६ रोजी १०६० वृक्षांचे रोपण करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वायगाव फाटा ते वायगाव (ता.टाकरखेडा संभू, जि. अमरावती) या ३ किमीच्या मार्गावर असलेले विघुत खांब अनेक वर्षापासून झुकलेले असल्याबाबत**

**(२०) ६२१८५ (१८-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वायगाव फाटा ते वायगाव (टाकरखेडा संभू, जि.अमरावती) या ३ किमीच्या मार्गावर असलेले विघुत खांब अनेक वर्षापासून झुकलेले असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री क्षेत्र वायगाव हे गणपतीचे मंदिर असून दर महिन्याच्या चतुर्थीच्या दिवशी हजारो भाविकांची पायदळ वारी या मार्गावरुन जात-येत असल्याने या तारा रस्त्यालगत गेल्याने प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला असल्याने येथील नागरिकांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चोकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने उपरोक्त प्रकरणी वीज वितरण कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०६-२०१७) :**(१) वायगाव फाटा ते वायगाव (जि.अमरावती, ता.टाकरखेडा संभू) या ३ किमीच्या मार्गावरील विद्युत खांब झुकलेले असल्याबाबतचे वृत्त दै.सकाळ अमरावती या वृत्तपत्रामध्ये दि.२६.३.२०१६ रोजी प्रकाशित झाले होते.

(२), (३) व (४) सदर वाहिनीचे झुकलेले ५ खांब महावितरणच्या संबंधित शाखा कार्यालयाकडून दिनांक ०४.०४.२०१६ रोजी सरळ करण्यात आले असून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मे. वोडाफोन आणि श्री. दत्तगुरू एन्टरप्रायजेस, पनवेल यांनी महावितरण वीजवाहिनीच्या केलेल्या नुकसानीबाबत**

**(२१) ६२९६८ (१६-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल येथील महावितरण कंपनीच्या वीजवाहिनीचे मे.वोडाफोन, ॲकुरा असोसिएटस व श्री. दत्तगुरू एन्टरप्रायजेस यांनी अनुक्रमे दिनांक २१ जानेवारी, २०१५ व दिनांक १७ फ्रेब्रुवारी २०१५ रोजी वा त्या सुमारास प्रचंड नुकसान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक अभियंता, राहूल लांजेवार, महावितरण, पनवेल यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने पदाचा गैरवापर करूत सदर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही बाब परिवर्तन सामाजिक संस्था महाराष्ट्र, नवीन पनवेल (प) यांनी उर्जा विभागाच्या विविध अधिकारी, सिडको, नवी मुंबई व खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्या दिनांक २८ मार्च २००६ रोजी लेखी स्वरूपात निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सहाय्यक अभियंता राहूल लांजेवार आणि त्यांचे सहकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०६-२०१७) :**(१) व (२) दि.२५/०१/२०१५ व दि.१७/०२/२०१५ रोजी मे.वोडाफोन व अंकरा असोसिएटस यांनी ११ के.व्ही. फिडरवर विना परवाना काम करतेवेळी भूमिगत वाहिनी नादुरुस्त केली ही दोन्ही कामे साहित्यांसह सदर कंपनीकडून दुरुस्त करुन घेण्यात आली व वीज पुरवठा तात्काळ पूर्ववत सुरु करण्यात आला.

तसेच दोन्ही प्रकरणी खांडेश्वर पोलीस ठाण्यामध्ये कंपनीविरुध्द महावितरण कंपनीतर्फे गुन्हा दाखल केला आहे.

(३) सदरील तक्रार दि.२३/०३/२०१६ च्या पत्रान्वये केलेली आहे.

(४) व (५) दक्षता व सुरक्षा विभाग, महावितरण कार्यालय, कल्याण विभागामार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल कंपनीच्या मुख्य कार्यालयास सादर करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अचलपूर (जि.अमरावती) येथील इन्फ्रा-२ अंतर्गत प्रलंबित कामे पूर्ण होणेबाबत**

**(२२) ६३९१२ (१८-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) येथील इन्फ्रा-२ अंतर्गत विविध कामांना प्रशासकीय मान्यता असूनही ही कामे अद्यापही प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अचलपूर मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींने दिनांक २१ एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाकडून इन्फ्रा-२ अंतर्गत प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

अचलपूर विभागाकरिता इन्फ्रा-२ च्या कामाचे कंत्राट निविदा प्रक्रियेद्वारे मे. कस्तुम इंजिनिअर्स, औरंगाबाद यांना दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी देण्यात आले होते. परंतु सदरची कामे विहित वेळेत पूर्ण न झाल्याने त्यांचे कत्राट अंशत: रद्द करुन स्थानिक पातळीवर कंत्राटदाराने हाती न घेतलेल्या (Untouched) कामाच्या ११ निविदा नव्याने काढून ऑक्टोबर, २०१६ कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ३०५ वितरण रोहित्रांपैकी ११६ रोहित्रांचे काम पूर्ण झाले आहे. २५० रोहित्र क्षमतावाढ कामापैकी २१० रोहित्रांची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच १ अतिरिक्त रोहित्राचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इगतपूरी तालुक्यातील (जि.नाशिक) येथे वीज वितरण कंपनीने वीज ग्राहकांना वेळेवर वीजबिले देण्याबाबत

**(२३) ६३९६१ (१८-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपूरी तालुका (जि.नाशिक) येथे वीज वितरण कंपनी वीजग्राहकांना वेळीच वीज बीले न देता वीज बिल भरले नाही असा ठपका ठेवून वीजजोडणी तोडण्यात येत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे कय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने वीज ग्राहकांना वेळेवर विजबीले देण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०६-२०१७) :**(१), (२) व (३) महावितरण कंपनीमार्फत शेती पंपाची वीज बिले ३ महिन्यातून एकदा व घरगुतीसह इतर सर्व प्रकारची बिले दर महिन्यास वाटप करण्यात येतात. जून,२०१६ दरम्यान बिले न मिळाल्याची कोणतीही तक्रार महावितरण कंपनीकडे प्राप्त झालेली नाही. परंतु ज्या ग्राहकांनी वीज बिले वेळेवर भरली नाहीत. त्यांचेवर विद्युत अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच शेती पंपाचे कोणतेही कनेक्शन थकबाकी अभावी माहे जून, २०१६ मध्ये खंडीत करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील उघडे डीपी व घरावरून गेलेल्या विद्युत लाईनमुळे धोका निर्माण झाल्याबाबत**

**(२४) ६४४९६ (१८-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात म.रा.वि.वितरण कंपनीच्या अनेक गावातील व शेतीपंपासाठी असलेले डीपी (रोहित्र) उघडे आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच अनेक गावातील उच्च दाबाची विद्युत लाईन व स्ट्रीट लाईट तारा नागरिकांच्या घरावरून व शाळेजवळून गेल्या असल्याने अनेक गावातील विद्युत लाईन मध्ये समस्या निर्माण झाल्याने नागरीकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याच माहे जून २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने सदर उघडे असलेले रोहित्र बंद करण्याबाबत तसेच घरावरून गेलेली लाईन बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१) लातूर जिल्हयातील काही गावातील व शेतीपंपासाठी असलेल्या रोहित्रांचे बॉक्स खराब झाल्यामुळे उघडे असल्याचे निदर्शनास आले.

(२), (३) व (४) लातूर जिल्हयातील अनेक गावातील नागरिकांच्या घरावरुन व शाळेवरुन गेलेल्या उच्च दाबाच्या व स्ट्रीट लाईटच्या तारा स्थलांतरीत करण्याच्या कामाकरिता आवश्यक अंदाजपत्रकीय रक्कम मिळण्याकरिता महावितरण कंपनीने जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांच्याकडे निधीची मागणी केलेली आहे. तसेच ज्या डीपी (रोहित्रांच्या) बॉक्सची दारे खराब आहेत किंवा उघडी आहेत अश्या डिस्ट्रीब्युशन बॉक्सची दारे बदलण्यासाठी INFRA - II या योजनेअंतर्गत कामे करण्यात आली असून एकूण ४८६ रोहित्रांचे बॉक्स बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महावितरण कंपनीच्या सेक्शन ऑफिस मध्ये तांत्रिक मनुष्यबळ वाढविण्याबाबत**

**(२५) ६५३५६ (०७-०१-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीजपुरवठा करणाऱ्या महावितरण कंपनीचे नागपूर, औरंगाबाद, पुणे आणि कल्याण असे चार प्रशासकीय विभाग करण्यात येणार होते, हे खरे आहे काय,

(२) त्याचप्रमाणे या विभागांपैकी दोन ठिकाणी तांत्रिक संचालकांची नियुक्ती करण्यात येणार असून उर्वरित दोन ठिकाणी प्रशासकीय सेवेतील अधिका-यांची (आयएएस) नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वर्षापूर्वी स्थापन झालेल्या मंडळ कार्यालयाकडील (सेक्शन ऑफीस) ग्राहकांची संख्या दुप्पट झाल्याने त्यांना सेवा देण्यास अडचण होत असल्याने प्रशासकीय विभाग वाढविण्याऐवजी सेक्शन ऑफीसात तांत्रिक मनुष्यबळ वाढविण्याची गरज असल्याचे सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन (एसईए) आणि मागासवर्गीय कर्मचारी संघटनेने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१७) :** (१) वीज वितरण व्यवस्था सुरळीत व परिणामकारक रहावी व अखंडीत वीज पुरवठा करण्याचे ध्येय साध्य होण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर अधिक परिणामकारक यंत्रणा निर्माण व्हावी या उद्देशाने व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने कोकण, पुणे, नागपूर व औरंगाबाद ही प्रादेशिक कार्यालये महावितरण कंपनी अंतर्गत निर्माण करण्यात आली आहेत.

(२) प्रादेशिक संचालक / सह व्यवस्थापकीय संचालक या पदावर मुंबई व औरंगाबाद या प्रादेशिक कार्यालयांमध्ये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची  नेमणूक करण्याची तरतूद आहे.

(३) होय.

(४) नवीन कार्यालये व अधिकारी / कर्मचारी पदांच्या निर्मितीची मानके निश्चित करण्याची प्रक्रिया महावितरण कंपनीमध्ये सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**मुंबई शहरातील वीज उपभोक्ता ग्राहकांकडून रुपये १८३ कोटींची तुट वसूल करण्याबाबत**

**(२६) ६५५५३ (०७-०२-२०१७). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर भागातील वीज उपभोक्ता ग्राहकांकडून परिवहन विभागाची सुमारे १८३ कोटींची तुट वसूल करण्याची प्रक्रिया बेस्ट उपक्रमाद्वारे सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत  वीज ग्राहक संघटना, इतर वीज उपभोक्ते तसेच घरगुती वीजग्राहक यांनी मा. मंत्री (ऊर्जा), मा. राज्यमंत्री (ऊर्जा), अतिरिक्त मुख्यसचिव (ऊर्जा), महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ संचालनालय तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि संबंधित इतर तत्सम अधिकारी यांच्याकडे दिनांक १८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने जनप्रतिनिधी व नागरिकांच्या संघटनेने सदर बाब वेळोवेळी राज्य विद्युत नियामक आयोगाच्याही निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बाबतीत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा कोणता अनुकूल निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) मुंबईतील वीज ग्राहकांकडून परिवहन विभागाची सुमारे रुपये १८३ कोटीची तूट वसूल करण्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. परंतु वीज ग्राहकांकडून परिवहन विभागाची तूट वसूल करणे थांबविण्यासाठीची निवेदने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास प्राप्त झाली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बासंबा (जि.हिंगोली) येथील विद्युत विभागाच्या बेजबाबदार कारभाराबाबत**

**(२७) ६६१८८ (०७-०१-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बासंबा (जि.हिंगोली) येथील विद्युत विभागाच्या बेजबाबदार कारभारामुळे ३३ के.व्ही. उपकेंद्राचा विद्युत पुरवठा खंडीत असतानाही तारेला विद्युत पुरवठा सुरु असल्याने या परिसरातील नागरिकांबरोबर शेतक-यांच्या जिवीताला धोका निर्माण झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत वरिष्ठानां सुचना देवून सुध्दा दुरुस्ती होत नसल्याची बाब निदर्शनास आली हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती सदरील तांत्रिक बिघाड दुरुस्त करुन या प्रकरणांतील दोषी असणाऱ्या विद्युत विभागातील संबंधित अधिका-यांवर व कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) ऑगस्ट, २०१६ च्या दरम्यान नवीन ३३ केव्ही बासंबा उपकेंद्रातील ११ केव्ही बासंबा गावठाण फिडरच्या ब्रेकरचा B फेज पोल नादुरुस्त झाल्याने ब्रेकर बंद असतानाही B फेजमध्ये लिकेज करंट येत असल्याचे निदर्शनास आले.
(२) सदर दुरुस्तीचे काम हमी कालावधीतील असल्याने दिनांक २३.०८.२०१६ रोजी ते संबंधित कंत्राटदाराकडून दुरुस्त करण्यात आले आहे.

(३) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(४) सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर तातडीने तांत्रिक बिघाड दुरुस्त करुन दिनांक २३.०८.२०१६ रोजी बासंबा व परिसरातील वीज पुरवठा पूर्ववत सुरळीत करण्यात आला. सदर प्रकरणी महावितरण कंपनीचा कर्मचारी दोषी न आढळल्यामुळे पुढील कारवाई करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे शहरासह ग्रामीण भागात अतिरिक्त वीजबिल देण्यात आल्याबाबत**

**(२८) ६७८९३ (१०-०१-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहरासह ग्रामीण भागात विजेचा वापर नगण्य असताना काही ग्राहकांना जून व जुलै महिन्याचे अतिरिक्त वीजबिल देण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती धुळे शहरासह ग्रामीण भागात ग्राहकांना वाढीव बिले कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :**(१) व (२) धुळे शहरासह ग्रामीण भागातील ग्राहकांचा सन २०१५-१६ या वर्षाचा वीजेचा वापर लक्षात घेऊन संगणकीय प्रणालीद्‌वारे सुरक्षा रक्कमेची अतिरिक्त देयके कंपनी नियमाप्रमाणे एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ या कालावधीमध्ये वितरित करण्यात आलेली आहेत. सुरक्षा रक्कमेची अतिरिक्त देयके ही नियमित देण्यात येणाऱ्या वीज देयकांसोबत वितरित करण्यात आलेली आहेत.
(३) व ४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कृषीपंप ग्राहकांना महावितरणतर्फे देण्यात येणाऱ्या वाढीव देयकांबाबत व गैरसोयींबाबत**

**(२९) ६८०९५ (१०-०१-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एकूण ३८ लाख वीजग्राहक असून कृषी ग्राहकांची वीजमागणी एकूण मागणीच्या २२ टक्के असून राज्यातील कृषी पंपाच्या नेमक्या वीज वापराची पडताळणी करण्याची जबाबदारी मुंबई आयआयटी च्या सेंटर फॉर टेक्नोलोजी आल्टरनेटीवस फॉर रुरल एरीयाज (सीटीएआरए) या संस्थेवर सोपवण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी पंप ग्राहकांना वर्षानुवर्षे एकाच रकमेची देयके, कृषी वीज वाहिन्यांतून गळती, कृषी पंपाच्या जोडभारात अचानक वाढ होणे या समस्या उद्भवल्या होत्या या पार्श्वभूमीवर कृषीपंप ग्राहकांच्या वीज वापराचे अचूक मुल्यांकन होणेसाठी राज्य सरकारने कृषी समिती व सीटीएआरए या त्रयस्थ संस्थेची नेमणूक केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कृषी पंप वीज वापराच्या नावाखाली महावितरणने यंत्रणेतून होणारी गळती लपवली, जादा वीज गळती दाखवून महावितरणने शासनाकडून जादा सबसीडी मिळवली असे आरोप महावितरणवर करण्यात आले असल्याचे दि . १३/८/२०१६रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबींची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) संबंधितांकडून असे आरोप महावितरणवर करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) उक्त बाबींच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीय तज्ञ समितीची स्थापना केली आहे.

(५) सदर समितीने अहवाल सादर केल्यानंतर अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्धापूर येथे (जि.नांदेड) येथे खाजगी वीज वितरण कंपनीच्या रिडींग घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनी योग्य पध्दतीने व वेळच्यावेळी रिडींग न घेतल्याबाबत

**(३०) ६८१०८ (१०-०१-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर (जि.नांदेड) येथे खाजगी वीज वितरण कंपनीच्या रिडींग घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनी योग्य पध्दतीने व वेळच्यावेळी रिडींग न घेतल्यामुळे माहे मे, २०१६ चे अवास्तव बिल आकरण्यात आले असून येथील वीज ग्राहकांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जादा युनिटचे बिल त्वरीत दुरूस्त करण्यात यावे, अशी मागणी येथील ग्राहक संरक्षण परिषदेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) नुसार शासनाने चौकशी करून येथे वीज बिलासाठी रिडिंगची नोंद घेणाऱ्या खाजगी कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच जादा युनिटचे वीजबीले त्वरीत दुरूस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) अर्धापूर (जि. नांदेड) उपविभागातील मे, २०१६ मध्ये एकूण ४,३६५ ग्राहकांपैकी फक्त १२ ग्राहकांची चुकीच्या मिटर रिडींगची नोंद झालेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ग्राहकांची चुकीच्या मिटर रिडिंगची नोंद घेणाऱ्या सदर रिडींग एजन्सीला दंड आकारण्यात आला असून सर्व चुकीची बिले दुरुस्त करुन देण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**अमरावती येथील महावितरणच्या कार्यालयासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याबाबत**

**(३१) ६८९४५ (२७-०१-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणाच्या अकोला येथील झोनल कार्यालयाचा ताण कमी करण्यासाठी अमरावती येथे स्वतंत्र कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती येथे नव्याने स्थापित करण्यात आलेल्या या कार्यालयासाठी आवश्यक असलेला तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी आकृतीबंधानुसार कर्मचारी वृंद उपलब्ध करुन देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरेशा कर्मचाऱ्याअभावी ग्राहकांची व शेतकऱ्यांची विद्युतविषयक कामे वेळच्यावेळी होत नसल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकांनी महावितरण कंपनीकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती येथील महावितरणच्या कार्यालयासाठी स्वतंत्र व पुरेसा कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०५-२०१७) :** (१) होय.

(२) अमरावती कार्यालयासाठी ४३ पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी २७ पदे भरलेली आहेत व इतर पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**आदिवासींच्या जमिनीचा सर्वंकश विकास करणारी “पडकई योजना”**
**राज्यस्तरीय योजना म्हणून राबविण्याबाबत**

**(३२) ६८९७१ (११-०१-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन परिपत्रक क्र टिएसपी-२०१५/प्र.क्र.१७४/कार्यासन-६-दि.१८ सप्टेंबर २०१५ परिशिष्ट “इ” मध्ये नमूद केल्याप्रमाणे मृदसंधारण उपयोजनांमार्फत जमिनीचा विकास (पडकई) ही राज्यस्तरावरील योजना जिल्हा नियाजन समितीकडे सोपविण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींच्या जमिनीचा विकास करुन त्यांच्या कृषि उत्पादनात वाढ करणारी योजना जिल्हा नियोजन समितीकडे पुनश्च सोपविल्यामुळे राज्यातील पडकई योजनेची कामे पूर्णपणे बंद आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासीसाठी कल्याणकारी असणारी ही योजना पूर्ववत राज्यस्तरीय योजना म्हणून राबविण्याबाबत लोकप्रतिनिंधींची शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती आदिवासीसाठी कल्याणकारी असणारी पडकई योजना पूर्ववत राज्यस्तरीय योजना म्हणून राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) आदिवासी उपयोजनेच्या निधीपैकी ६० % निधी जिल्हा योजनेसाठी देण्यात येत असल्याने व स्थानिक विकास योजनांसाठी स्थानिक पातळीवर प्रशासकीय मान्यता घेऊन त्वरित अंमलबजावणी होण्यासाठी दि.१८-०९-२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सदरहू योजना राज्य स्तरावरुन जिल्हा स्तरावर वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदरहू योजना प्रशासकीय विभाग म्हणून जलसंधारण विभागाकडून राबविली जाते. सदर योजनेकरिता आदिवासी विकास विभागाकडून फक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येत असून प्रत्यक्ष कार्यवाही जलसंधारण विभागाकडून करण्यात येते. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात या योजनेकरिता जिल्हा स्तरावर निधी सुध्दा अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. त्यामुळे सदरची योजना जिल्हा स्तरीय योजनेमधून वगळून पुर्ववत राज्य स्तरीय योजनेमध्ये समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) शहरातील वीजग्राहकांना पूर्णवेळ वीज उपलब्ध होण्याबाबत**

**(३३) ६९९८३ (२७-०१-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) शहरात वीज वितरण कंपनीकडून सुरळीतपणे वीजपुरवठा करण्यात यावा यासाठी ग्राहकांकडून वारंवार तक्रारी करून सुध्दा या तक्रारींची दखल घेतली जात नाही त्यामुळे वीजग्राहक त्रासले असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वीज वितरण कंपनीतील कार्यालयातील अभियत्यांसह अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती करमाळा शहरातील वीजग्राहकांना पूर्णदाबाने पूर्णवेळ वीज उपलब्ध होण्याबाबत तसेच वीजवितरण कंपनी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) माहे जून, २०१६ या कालावधीमध्ये करमाळा नगरपरिषदेद्वारे शहरातील जुने पथदिवे बदलून नवीन एल.ई.डी. पथदिवे बसविण्याचे काम चालू होते. त्याकरिता नगरपरिषदेकडून परस्पर वेळोवेळी विद्युत पुरवठा बंद करण्यात येत होता. तसेच माहे जून, २०१६ मध्ये व त्यानंतर करमाळा शहर व परिसरामध्ये अनेकवेळा जोराचे वादळासह पाऊस झाल्याने विद्युत पोल पडल्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार घडले.

(२) हे खरे आहे.

(३) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) करमाळा शहरातील ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी ३३/११ के.व्ही. करमाळा उपकेंद्रामध्ये पायाभूत सुविधा आराखडा-२ अंतर्गत अतिरिक्त ५ एमव्हीए चे पॉवर ट्रान्सफॉर्मर माहे सप्टेबर, २०१६ मध्ये कार्यान्वित करण्यात आले असून करमाळा शहरासाठी स्वतंत्र ११ के.व्ही.चे तीन फिडर्स कार्यान्वित करण्यात आले आहेत. सद्यस्थितीला करमाळा शहरामध्ये योग्य दाबाने व नियमित वीज पुरवठा करण्यात येत आहे.

करमाळा शहरात अभियंत्यांच्या ७ पदांपैकी १ पद रिक्त आहे. यंत्रचालक व वाहिनी कर्मचाऱ्यांची २८ पदे रिक्त असून या पदांकरिता २१ बाहयस्त्रोत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे व ७ पदे रिक्त आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात ठिकठिकाणी असलेल्या वीजेच्या उघड्या डीपीमुळे नागरीकांचा विशेषत: लहान मुलांचा जीव कायम धोक्यात असल्याबाबत**

**(३४) ७०८११ (०७-०१-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात ठिकठिकाणी असलेल्या वीजेच्या उघड्या डीपीमुळे नागरीकांचा विशेषत: लहान मुलांचा जीव कायम धोक्यात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विजेच्या उघड्या डीपीबाबत प्रशासन कोणतीच उपाययोजना करीत नसल्याने याच्या निषेधार्थ वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना जागे करण्यासाठी "काका मला वाचवा" हे अभिनव आंदोलन लहान मुलांनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) नाशिक शहरात मिनी पिलर व डिस्ट्रीब्युशन बॉक्स यांची झाकणे अज्ञात इसमांकडून चोरीच्या उद्देशाने उघडली किंवा काढली जातात.

(२) माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये आंदोलन करण्यात आले होते.

(३) नाशिक शहरात सन २०१६ मध्ये इन्फ्रा योजनेअंतर्गत एकूण १२०५ मिनीफिडर पिलर बदलण्यात आले आहेत. १३५ खराब झालेले मिनीफिडर पिलर दुरुस्ती अथवा बदलविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच केंद्र शासनाच्या आयपीडीएस योजनेअंतर्गत एकूण २९९ जुने डिस्ट्रीब्युशन बॉक्स बदलण्याचे काम प्रस्तावित आहे. तसेच मिनी पिलर व डिस्ट्रीब्युशन बॉक्सला झाकणे नसल्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर त्वरीत कार्यवाही केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनसिंगी, जुना धामणगांव रेल्वे या शहरासाठी ५ MV चे सबस्टेशन उपलब्ध करण्याबाबत**

**(३५) ७०८७५ (०७-०१-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनसिंगी, जुना धामणगांव रेल्वे या शहरासाठी ५ MV चे सबस्टेशन उपलब्ध करण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी कार्यकारी अभियंता (ग्रा.) म.रा.वि.वि.कं.मर्या. अमरावती यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निवेदनाची तातडीने दखल घेऊन सदरहू ट्रान्सफॉर्मरची कामे तातडीने करून कार्यान्वित करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) धामणगाव रेल्वे उपविभागांतर्गत ३३ के.व्ही. अंजनसिंगी उपकेंद्रामध्ये ५ MVA चे अतिरिक्त रोहित्राचे काम पूर्ण करुन दिनांक २३.११.२०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच ३३/११ के.व्ही धामणगाव रेल्वे उपकेंद्र येथे ५ MVA चे अतिरिक्त रोहित्राचे काम पूर्ण झाले असून सदरहू रोहित्र दि. ०६.०२.२०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहिगाव (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) येथील रोहित्रांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३६) ७१०१५ (०७-०१-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिगाव (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) येथील दोन शेतवस्तीवरील सिंगल फेज रोहित्र जळाल्याने गेल्या दोन महिन्यांपासून येथील नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून येथील जळालेल्या रोहित्रांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) सदर ठिकाणी तीन सिंगल फेजची (२५x३ के.व्ही.ए.) रोहित्रे दिनांक १८.१०.२०१६ रोजी नादुरुस्त झाली होती. सदर रोहित्रांवरील ग्राहकांना जवळच्या कृषी वाहिनीवरील थ्री फेज रोहित्रावरुन तात्पुरता पुरवठा देण्यात आला होता.
(२) सदर रोहित्रे दिनांक २४.१०.२०१६ रोजी गाळणी शाखा, कन्नड येथे दुरुस्तीसाठी पाठविण्यात आली. कन्नड गाळणी शाखेतून दिनांक २१.११.२०१६ रोजी २५ के.व्ही.ए.ची २ रोहित्रे उपलब्ध झाल्यानंतर सदर ठिकाणी ती बसविण्यात आली व दिनांक १५.०१.२०१७ रोजी उर्वरित १ रोहित्र बसविण्यात आले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण शहरातील जीर्ण झालेल्या विद्युत वाहिन्यांचा धोका वाढल्याबाबत**

**(३७) ७१३७५ (२७-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण शहरात दि.२९.८.२०१६ रोजी वा त्या सुमारास एनआय हायस्कूल रस्त्यावरील गंजलेली विद्युत वाहिनी तुटल्याने स्फोट झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्फोटात जिवितहानी व वित्तहानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील अशाच सडलेल्या विद्युत वाहिन्यांचा धोका वाढला असून शासनाने याची पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१७) :** (१) व (२) उरण उपविभागातील उरण शहरात देऊळवाडी परिसरातील भुमिगत लघुदाब वाहिनी ही उरण नगरपालिकेने गटरीचे काम करत असताना तुटली, त्यामुळे एन. आय. शाळेच्या समोरील उपरी लघुदाब वाहिनीवरुन देऊळवाडी परिसरात विद्युत पुरवठा देण्यात आला होता. परंतु सदर लघुदाब वाहिनीवर अतीभार झाल्यामुळे विद्युत वाहिनी तुटली. तथापि, जिवितहानी व वित्तहानी झालेली नाही.
(३) उरण शहरातील जुन्या विद्युत वाहिन्या बदलविण्याचे व नूतनीकरणाचे काम दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना (DDUGJY) व एकात्मिक ऊर्जा विकास कार्यक्रम (IPDS) या योजनेअंतर्गत मंजूर असून निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) येथील पश्चिम किनारपट्टीवरील गावात वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असल्याबाबत

**(३८) ७१३९२ (०७-०१-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) येथील पश्चिम किनारपट्टीवरील चाळीस ते पन्नास गावात तसेच खेडो-पाड्यात माहे जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा बंद झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर गावांना नियमित व सुरळीत वीजपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) व (२) पालघर जिल्ह्यातील डहाणूच्या पश्चिम किनारपट्टीवरील पावसाळी व वादळी हवामानामुळे माहे जुलै महिन्यात १७ तास, ऑगस्ट महिन्यात १० तास व सप्टेंबर महिन्यात ७ तास साखरा पाणीपुरवठा वाहिनी नादुरुस्त असल्याने बंद होती. वेळोवेळी या वाहिनीवरील फॉल्ट काढून वीज पुरवठा पूर्ववत चालू करण्यात आला होता.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोकमान्यनगर (जि. ठाणे) येथे विजेचे काम करीत असलेल्या कर्मचा-याचा विद्युत वाहीनीचा शॉक लागुन मृत्यु झाल्याबाबत**

**(३९) ७१४७१ (०७-०१-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकमान्यनगर (जि. ठाणे) येथे काम करीत असलेल्या कर्मचा-यांचा विद्युत वाहीनीचा शॉक लागुन मृत्यु झाल्याची घटना दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घड,ली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर घटनेत मृत झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) दि. १० सप्टेंबर, २०१६ रोजी ठाणे लोकमान्यनगर भागात वीजेचे काम करीत असताना तंत्रज्ञास वीजेचा धक्का लागून मृत्यू झाला.

(२) सदर प्रकरणाची विद्युत निरीक्षक कार्यालय विभाग क्र. १ ठाणे यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) सिंगल फेज वीज ग्राहकांच्या सर्व्हिस वायर्स वरील वरचे आवरण काढत असताना त्या सर्व्हिस वायर्सद्वारे रिटर्न विद्युत प्रवाह आल्याने वीजेचा धक्का बसून मृत्य झाला, असे विद्युत निरीक्षक यांनी नमूद केले आहे.

महावितरण कंपनीकडून, सदर घटना घडल्यानंतर मृताचे कुटुंबियास तातडीची आर्थिक मदत रु. १०,०००/- अदा करण्यात आली असून , त्यानंतर एक महिन्याच्या पगाराइतकी रक्कम रु. ४३,८८८/- आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात आली आहे. तसेच “कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अन्वये नुकसान भरपाई रक्कम रु. ४,८४,२००/-मा. आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांचेकडे धनादेशाद्वारे जमा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील निमखेड (ता.मौदा) घोटीटोक, (ता.रामटेक) ढवलापूर (ता.पारशिवनी) येथे पंडीत दिनदयाल उपाध्याय योजनेतून सबस्टेशन मंजुर करण्याबाबत**

**(४०) ७१५६१ (०७-०१-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील निमखेड (ता.मौदा) घोटीटोक, (ता.रामटेक) ढवलापूर (ता.पारशिवनी) येथे पंडीत दिनदयाल उपाध्याय योजनेतून सबस्टेशन मंजुर करण्याची निवदेनाद्वारे लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) नागपूर जिल्ह्यातील निमखेडा (तारसा) तालुका मौदा येथील उपकेंद्र पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत मंजूर असून काम प्रगतीपथावर आहे.

ढवलापूर, ता. पारशिवनी येथील उपकेंद्र दिनदयाल ग्राम ज्योती योजनेमध्ये समाविष्ट असून उपकेंद्राची जागा अद्याप ताब्यात मिळाली नाही. घोटीटोक, ता. रामटेक येथील उपकेंद्रांचे अंदाज पत्रक महावितरण कंपनीने मंजूर केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बदलापूर शहरातील महावितरणच्या गैरकारभाराबाबत

**(४१) ७१८५७ (१०-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर शहरात मागील काही दिवसांपासून महावितरणचा गैरकारभार समोर येत अून मीटरचे रिडिंग न घेताच वीजेचे बिल नागरिकांना पाठविण्यात आल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी मागील महिन्याची बिले ५० दिवसांची रिडिंग घेऊन पाठविण्यात आली होती आणि आता रिडिंग न घेताच विज बिले पाठविल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार नागरिकांना दिलासा देण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) बदलापूर शहरामध्ये माहे ऑक्टोबर, २०१६ या महिन्याची वीज देयके नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन काढण्यात आली असल्याने त्या महिन्यात मीटर रिडींग न घेता काही नागरिकांना वीजेची बिले पाठविण्यात आली होती. ती नोव्हेंबर, २०१६ मध्ये दुरुस्त करुन देण्यात आली आहेत.

(२) माहे सन सप्टेंबर, २०१६ मध्ये मीटर वाचन हे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन घेताना संबंधित मीटर रिडिंग एजन्सीला काही तांत्रिक अडचणी आल्यामुळे काही प्रमाणात ग्राहकांचे मीटर वाचन जास्त दिवसांचे झाले आहे.

(३) महावितरण कंपनीतर्फे चौकशी करण्यात आली आहे.

(४) वीजवापर केलेल्या ग्राहकांना अचूक रिडिंग घेऊन वेळेत व योग्य देयक देण्यासाठी बदलापूर पूर्व व पश्चिम या उपविभागातील संबंधित एजन्सीला ग्राहकांचे मीटर वाचन वेळेवर घेण्याचे आदेश महावितरण कंपनीमार्फत देण्यात आलेले आहेत.

---

**मौजे ध.टाकळी (ता.पूर्णा, जि.परभणी) येथील शेतकरी कृषीपंप चालवण्यासाठी जुन्या रोहीत्राचा वापर केला जात असल्याबाबत**

**(४२) ७१८६७ (०७-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ध.टाकळी, (ता.पूर्णा, जि.परभणी) येथील शेतकरी कृषीपंप चालवण्यासाठी जुन्या रोहीत्राचा वापर करत असून यामुळे अतिरिक्त भार येत असून या कारणास्तव माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये ध.टाकळी येथील लाईनमन यांनी सर्वे करुन अतिरिक्त भार असल्याचा अहवाल उप अभियंता, पूर्णा यांच्याकडे देऊन दोन रोहीत्र मंजूर करुन घेतलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहीत्राची जोडणी करण्यासाठी कनिष्ठ अभियंता व उप अभियंता, पूर्णा हे जाणिवपूर्वक टाळाटाळ करत आहेत व शेतक-यांना फे-या मारायला लावत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत माहे सप्टेंबर, २०१६ रोजी 'आपले सरकार' या पोर्टलवर तकार नोंदवली असून नविन जोहीत्र जोडणी देण्याबाबत संबंधित अधिकारी जाणिवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याबाबत शासनाने कारवाई केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे ध. टाकळी येथे कृषीपंपासाठी दोन नवीन रोहित्रे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये कार्यान्वित करण्यात आली आहेत. तसेच याविषयी माहे सप्टेंबर, २०१६ रोजी आपले सरकार या पोर्टलवर कुठल्याही प्रकारची तक्रार नोंदविण्यात आलेली आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनकाई, अंगुलगाव व भरवसफाटा (जि.नाशिक) येथे नविन विद्युत उपकेंद्राची स्थापना करण्याबाबत**

**(४३) ७१९२४ (०७-०१-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनकाई, अंगुलगाव व भरवसफाटा (जि.नाशिक) येथे नविन विद्युत उपकेंद्र स्थापन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर २०१५ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न (१) मधील उपकेंद्रांना दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योत /आयपीडीएफ मध्ये अंतर्भूत करण्याचे मा.मंत्री, ऊर्जा यांनी दि.११ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास महावितरणाच्या संचालकास निर्देश दिले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या अनुषंगाने अनकाई, अंगुलवार व भरवसफाटा (जि.नाशिक) येथे नविन विद्युत उपकेंद्र स्थापन करण्यासाठी शासनामार्फत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

सदर उपकेंद्रापैकी अनकाई येथे नवीन उपकेंद्र तांत्रिक दृष्ट्या सुसाध्य नसल्यामुळे प्रस्तूत उपकेंद्राऐवजी अनकाई गावापासून जवळच मौजे कुसुर, ता.येवला येथे नवीन उपकेंद्र तसेच अंगुलगाव, ता. येवला व भरवसफाटा, ता. निफाड या ठिकाणी उपकेंद्रे महावितरण कंपनीस्तरावर प्रस्तावित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घारफळ (ता.बाभुळगाव) या परीसरातील गावातील विज वितरण कंपनीच्या नादुरूस्त ट्रान्सफॉर्मरमुळे विजपुरवठा खंडीत असल्याबाबत**

**(४४) ७२६०६ (०७-०१-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगांव तालुक्यातील येरंडगांव, पाचखेड, घारफळ या गावातील वीजवितरण कंपनीच्या नादुरूस्त ट्रान्सफॉर्मरमुळे विजपुरवठा २० दिवसापासुन खंडीत असल्यामुळे सिचंनाअभावी खरीप हंगामातील पिके करपली असल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील शेतकरी आर्थिक संकटात असून त्यांना सिचंनाकरीता आवश्यक त्या उपाययोजना करून किमान १२ तास सलग विजपुरवठा संबधित विभागाकडुन करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, नादुरूस्त ट्रान्सफॉर्मर व खंडीत विजपुरवठा अभावी शेतक-याच्या झालेल्या नुकसानीस जबाबदार असलेल्या संबधितावर आवश्यक ती कारवाई करण्यात येवुन नुकसान भरपाई देण्यात येईल काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) बाभुळगाव उपविभागात माहे सप्टेंबर, २०१६ या कालावधीमध्ये मौजा एरंडगाव, पाचखेड, घारफळ या गावातील कुठल्याही प्रकारचे रोहित्र बंद नव्हते किंवा नादुरुस्त नव्हते.

(२) पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान होवू नये म्हणून राज्यातील सर्व कृषी ग्राहकांना दि. ०८.०९.२०१६ ते दि. १५.१२.२०१६ पर्यंत दिवसा १२ तास व रात्री १२ तास असे चक्राकार पध्दतीने शेतीसाठी ३ फेज वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्यात आला होता.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महावितरण कंपनीकडे मोबाईल ॲपच्या सहाय्याने केवळ २४ तासात वीजजोडणी कार्यान्वित करण्यात येणार असल्याबाबत**

**(४५) ७२८५४ (०७-०१-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरण कंपनीकडे वीजजोडणीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर मोबाईल ॲपच्या सहाय्याने केवळ २४ तासात वीजजोडणी कार्यान्वित करण्यात येणार असल्याची सरकारने घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) राज्यातील काही निवडक ठिकाणी मोबाईल ॲपद्वारे २४ तासात विद्युत जोडणी देण्याबाबतची योजना माहे सप्टेंबर, २०१६ पासून महावितरण कंपनीमार्फत कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

(२) या योजनेअंतर्गत, अर्जदाराने वीज पुरवठा मागणी केलेल्या ठिकाणी थकबाकी नसल्यास, नवीन वीज पुरवठा देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा ज्या ठिकाणी उपलब्ध आहेत अशा ठिकाणी अर्जदाराने नवीन वीज पुरवठयासाठी आवश्यक ती रक्कम महावितरण कंपनीकडे अदा केल्यानंतर २४ तासात नवीन वीज जोडणी देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. या प्रणालीद्वारे सप्टेंबर, २०१६ ते डिसेंबर, २०१६ अखेर अर्ज केल्यानंतर २४ तासामध्ये एकूण १०,०२७ ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात आलेला असून सदर वीज जोडण्या देण्याचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने पारदर्शकपणे होत असल्यामुळे ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील अनेक गावातील भिल्ल समाजातील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळण्याबाबत**

**(४६) ७४७२३ (१९-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील अनेक गावातील भिल्ल समाज लाभार्थ्यांनी तहसिल कार्यालयात शबरी आदिवासी घरकुल योजनेंसाठीचे अर्ज सादर केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अर्जाना प्रकल्प आदिवासी कार्यालय, धुळे यांनी मंजूरी दिली होती परंतु ती मंजूरी रद्द करुन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा शबरी आदिवासी विकास घरकुल योजनेंसाठीचा अर्ज नविन मागवित आहे, या योजनेसाठी ग्रामसेवेचा ठराव लागत असल्याने ग्रामसेवक ठराव देण्यास टाळाटाळ करीत असून ते संबंधित लाभार्थ्यांकडून लेखी मागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी ग्रामसेवकांना सूचना देण्याचे आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही. शबरी आदिवासी घरकुल योजनेबाबतच्या शासन निर्णय क्र.घरकुल २०१६/प्र.क्र३७/का-१७ दि.१५ मार्च, २०१६ मधील अटी व शर्तीनुसार ग्रामसभेच्या ठरावाद्वारे संबंधित गट विकास अधिकारी यांच्या शिफारशींसह प्राप्त झालेल्या प्रस्तावातून जिल्हा स्तरीय समितीमार्फत १३०८ घरकुल लाभार्थ्यांची निवड करुन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे यांच्यामार्फत ऑनलाईन मंजूरी करुन १०५२ लाभार्थ्यांना पहिला हप्ता व ६८ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता सुध्दा वितरित करण्यात आलेला आहे. घरकुलाच्या लाभार्थ्यांना दुसरा हप्ता सुध्दा ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात आलेला आहे व बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील (जिल्हा नाशिक) पंचवटीतिल वाघाडी परिसरात राज्य उत्पादन शुल्काच्या भरारी पथकाने लाखो रुपयांचा बनावट मद्य साठा जप्त केल्याबाबत

**(४७) ७९३१० (२८-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील (जि.नाशिक) पंचवटीतील वाघाडी परिसरात राज्य उत्पादन शुल्काच्या भरारी पथकाने दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लाखो रुपयांचा बनावट मद्यसाठा जप्त केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०६-२०१७) :** (१), (२) व (३) होय, निरीक्षक, विभागीय भरारी पथक, नाशिक यांनी दि.२.२.२०१७ रोजी घर क्र. एफ ५२ वाल्मिक नगर, पंचवटी नाशिक ता. जि. नाशिक येथे छापा घालून भारतीय बनावटीचे विदेशी मद्य, बनावट मद्याने भरलेल्या विविध ब्रॅण्डच्या बाटल्या व बनावट मद्य तयार करण्यासाठी लागणारे साहित्य असा एकूण रू.१,०८,९०८/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधील कलम ६५ (a) (b)(d)(e)(f) अन्वये गु.रजि. क्र.१८/२०१७ दाखल केला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. उक्त प्रकरणी सखोल चौकशी केली असता बनावट मद्य

करण्यासाठी साहित्य पुरवठा करणाऱ्या एका आरोपीस दि.३/२/२०१७ रोजी अटक करण्यात आली. आरोपीच्या ताब्यातून परराज्यातील भारतीय बनावट विदेशी मद्यसाठा, बनावट मद्य तयार करण्यासाठी लागणारे साहित्य इ. असा एकूण रू.५,६५,६१२/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. नोंदविलेल्या गुन्हयासंदर्भात पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झोडगा (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील विदयुत केंद्राचे काम अपुर्ण आसल्याबाबत**

**(४८) ८२१२० (२८-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील झोडगा ता.मालेगांव येथील २२० के.व्हि.विज केंद्राचे काम गत ३-४ वर्षापासुन अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे. काय,

(२) असल्यास, या विज केंद्रामुळे शेतकऱ्यांच्या सुमारे ७०० कृषीपंपाच्या विज जोडण्यावर विपरीत परिणाम झालेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, झोडगा येथील विदुयत केंद्राचे काम पुर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महापारेषण कंपनीतर्फे उभारण्यात येत असलेले २२०/१३२ के.व्ही. मालेगांव (झोडगा) नवीन उपकेंद्र हे वाशिम जिल्हयातील पारेषण प्रणाली सक्षम करण्यासाठी उभारण्यात येत आहे. मालेगांव तालुक्यातील वीज भाराची पूर्तता महापारेषण कंपनीच्या अस्तित्वात असलेल्या १३२/३३ के.व्ही. मालेगांव उपकेंद्रातून करण्यात येते. १३२ के.व्ही. मालेगांव उपकेंद्राची स्थापित क्षमता १०० एम.व्ही.ए. एवढा भार असून त्या उपकेंद्रात क्षमता शिल्लक असल्यामुळे काम सुरु असलेल्या २२०/१३२ के.व्ही. मालेगांव उपकेंद्राचे काम अद्याप पूर्ण न झाल्यामुळे कृषिपंपांच्या वीज जोडणीवर विपरीत परिणाम झालेला नाही.

(३) २२० के.व्ही. मालेगांव (झोडगा), जि. वाशिम उपकेंद्राचे काम मे. ईसीआय कंपनीस देण्यात आले होते. परंतु कामाची गती समाधानकारक नसल्याने महापारेषण कंपनीने सदर कामाचे कंत्राट रद्द करुन उर्वरित कामाचे कंत्राट सात भागात विभागून (उपकेंद्राचे काम तीन भागात व वाहिनीचे काम चार भागात) नव्याने कंत्राट दिले आहे. सद्यस्थितीत उपकेंद्राचे ८३% काम पूर्ण झाले असून संपूर्ण काम सप्टेंबर, २०१७ अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यात अवैध १० लाख ७५ हजार रुपयाचा दारू साठा जप्त करण्यात आल्याबाबत**

**(४९) ८२४९८ (२८-०४-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात अवैध दारू विक्री होत असून दि.१ मे ते ३१ ऑगस्ट, २०१६ ह्या कालावधीत १० लाख ७५ हजार रुपये किंमतीचा दारू साठा जप्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच अवैध दारू विक्री रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०६-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे आहे. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भंडारा येथील अधिकाऱ्यांनी दि. १ मे ते ३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीत ३४५ गुन्हे नोंदविले आहेत. यामध्ये २७२ आरोपींना अटक करण्यात आली असून रू.२४,०५,०६४/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीं विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार कारवाई करण्यात येत आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीं विरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येत असून पुढील तपास चालू आहे. अवैध मद्य विक्री रोखण्याबाबत विभागाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पातुर तालुक्यातील (जि.अकोला) खानापूर येथील द्वारकाबाई बेलुलकर या विधवा महिलेच्या शेतात विनापरवानगी उच्च दाबाचे टॉवर टाकल्याबाबत**

**(५०) ८२५१८ (२८-०४-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातुर तालुक्यातील (जि.अकोला) खानापूर येथील द्वारकाबाई बेलुलकर या विधवा महिलेच्या शेतात जेसीबी मशीन लावून गहू व हरभरा या उभ्या पिकाचे नुकसान करून शेतक-याची कोणतीही परवानगी न घेता उच्च दाबाचे टॉवर टाकण्याचा प्रकार वीज महापारेषण कंपनीने केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शेतक-याच्या विरोधात पोलिसांत तक्रार देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-याची कोणतीही परवानगी न घेता शेतात टॉवर उभारण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून विधवा शेतक-यास नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) महापारेषण कंपनीतर्फे वाशिम जिल्हयातील मालेगाव तालुक्यात २२० के.व्ही. मालेगाव (झोडगा) उपकेंद्राचे काम सुरु आहे. सदर उपकेंद्रासाठी २२० के.व्ही. बाळापूर-मालेगाव या वाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे. सदर वाहिनीचा एक मनोरा श्रीमती द्वारकाबाई बेलुलकर (ता. पातूर) यांच्या शेतात उभारणे प्रस्तावित होते. त्यानुसार महापारेषण कंपनीने त्यांना नोटीस देण्यास गेले असता नोटीस घेण्यास त्यांनी नकार दिला व मनोरा उभारणीच्या कामास अडथळा निर्माण केला.

सदर अडथळा दूर करण्यासाठी महापारेषण कंपनीने कायद्यातील तरतुदीप्रमाणे जिल्हाधिकारी, अकोला यांना विनंती केली. जिल्हाधिकारी यांनी, कामात अडथळा निर्माण करु नये व महापारेषण कंपनीच्या कामात सहकार्य करण्याबाबत त्यांच्या दि. ११.११.२०१६ अन्वये आदेश दिले. परंतु संबंधितांचा विरोध कायम असल्यामुळे महापारेषण कंपनीने जिल्हा पोलिस अधीक्षक, अकोला यांचेकडे उपस्थितीत काम करु देण्याबाबत विनंती केली व त्यानुसार पोलिस उपस्थितीत सदर मनोऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(४) सदर मनोऱ्याची पायाभरणी, उभारणी व वाहिनी उभारणी याकरिता काम करतेवेळी झालेल्या नुकसान भरपाईचे पंचनामे करुन संबंधितांस धनादेशाद्वारे एकूण रु. १,३६,७१४ नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.